# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

पारनेर तालुका सैनिक सहकारी बँक लि,पारनेर या बँकेची **३१ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा **मंगळवार दि. २९.०९.२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. बँकेचे प्रशासक मा.नामदेव गोरक्षनाथ ठोंबळ** यांचे अध्यक्षतेखाली **लक्ष्मी नारायण मंगलकार्यालय, हिंद चौक (कचेरी रोड), ता. पारनेर, जि. अहिल्यानगर** येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी होणार आहे. सभेस मा. सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील दिनांक २९.०९.२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे.
२. सन २०२५-२६ या वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफातोटा पत्रक स्विकृत करणे.
३. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षक यांचे लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे व सन २०२४-२५ या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
४. सन २०२५-२६ या सालात अंदाज पत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या खर्चास मान्यता देणे व सन २०२६-२७ सालाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५. सन २०२६-२७ या वर्षाकरिता रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार केलेल्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी बँकेच्या मा. प्रशासकाने रिझर्व बँकेला शिफारस केलेल्या सनदी लेखपरीक्षकाच्या नियुक्तीस व मेहनतान्यास मान्यता देणे.
६. बँकेचे मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० कलम ७५ (२) नुसार माहिती घेणे.
७. महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या व बँकेने स्विकारलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत आलेल्या अर्जांना तत्कालीन संचालक मंडळाने दिलेल्या मंजुरीस व सुट दिलेल्या रकमेविषयी चर्चा करणे.
८. बँकेच्या लॉन्ग टर्म पर्सफेक्टीव्ह (डेव्हलपमेंट) प्लॅन व वार्षिक कार्यवाहीचा आढावा घेउन त्यास मान्यता देणे.
९. सभासदांना बँकिंग शिक्षण व प्रशिक्षण याचा आढावा घेउन पुढील कार्यवाही करणे.
१०. बँकेच्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या बँकेच्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करणे.

**स्थळ :** पारनेर
**दिनांक :** १३/०९/२०२६

मा. प्रशासक यांचे आदेशावरून
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

## सभासदांना विशेष सुचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी त्याच विषयांवर अर्ध्या तासानंतर सुरू केली जाईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. अहवाल प्रत बँकेच्या मुख्य कार्यालय व सर्व शाखा कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच बँकेच्या संकेत स्थळ www.parnersainikbankltd.com वर सुध्दा उपलब्ध आहे.
३. वरील वार्षिक सर्वसाधारण सभेत होणा-या विषयासंबंधी काही सुचना करावयाच्या असल्यास किंवा प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी सुचना किंवा लेखी स्वरूपात सभेच्या तारखेपुर्वी आठ दिवस आगोदर पोहचतील आशा रितीने बँकेच्या मुख्य कार्यालयात पाठवाव्यात.
४. सभेचे कामकाज संपल्यानंतर सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे. त्याचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा.
५. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सभासदांनी/खातेदारांनी आपली के.वा.सी. पुर्तता त्वरीत पुर्ण करावी.
६. ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत आपले भाग दाखले घेतले नसतील त्यांनी बँकमध्ये समक्ष येउन घेउन जावे.
७. सर्व सन्माननीय भागधारकांना विनंती करण्यात येते की, आपला मोबाईल नंबर व ईमेल आयडी बँकेकडे नोंद करावी म्हणजे बँकेला डिजीटल वार्षिक अहवाल पाठविता येईल.